रागाच्या भरात चुकीचे बोलू नका; मन:स्थिती सुधारेल, पण उच्चारलेले शब्द परत येत नाहीत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर  कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार ५ मे २०२५ | अंक १४० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# भारत-पाक युद्ध झाले तर मी इंग्लंडला पळून जाईल पाकिस्तानी राजकारणी नेत्याचा व्हिडिओ व्हायरल

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे 22 एप्रिल रोजी पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात 26 पर्यटकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावले उचलली. भारताने सिंधू पाणी करार रद्द केला. तसेच आयात-निर्यातीवर बंदी आणली. पाकिस्तानविरोधात अनेक कठोर उपाय भारताने केल्यानंतर लष्करी कारवाईसाठी भारतीय लष्कराला खुली छूट दिली आहे. आता भारत पाकिस्तानवर मोठी कारवाई करु शकतो, अशी चर्चा सध्या सुरु आहे. त्या चर्चेत पाकिस्तानी राजकारणी शेर अफजल खान मारवात यांचे वक्तव्य व्हायरल झाले आहे.पाकिस्तान नॅशनल असेम्बलीचे सदस्य असलेल्या अफजल खान मारवात यांना



पत्रकारांनी भारत-पाकिस्तान युद्धाबाबत प्रश्न विचारला. भारत पाकिस्तानमध्ये युद्ध झाल्यावर तुम्ही लढणार का? त्यावर त्यांनी दोन्ही देशांमध्ये युद्ध झाल्यावर मी इंग्लंडमध्ये निघून जाईल, असे उत्तर दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्यासाठी पावले उचलायला हवे होते? असा प्रश्न मारवत यांना पुन्हा विचारण्यात आला. त्यावर मारवात म्हणतात, मोदी माझ्या आत्याचा मुलगा आहे का? ज्यामुळे मी सांगितल्यावर ते माघार घेतील. त्यांचे हे उत्तर सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले आहे. नेटकरी म्हणतात, पाकिस्तानी राजकारण्यांनाही आपल्या लष्करावर विश्वास राहिला नाही.

कोण आहे मारवत?

शेर अफजल खान मारवत हे एक ज्येष्ठ पाकिस्तानी राजकारणी आहेत. ते माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पक्ष पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) मध्ये होते. परंतु त्यांनी अनेक वेळा पक्ष आणि त्यांच्या नेत्यांवर टीका केली आहे. ज्यामुळे इम्रान खान यांनी त्यांना पदांवरून काढून टाकले.

## सलग दहाव्या दिवशी गोळीबार

दरम्यान, भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव कायम आहे. शनिवारी रात्री पाकिस्तानी सैन्याने सलग दहाव्या दिवशी जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा, बारामुल्ला, पूंछ, राजौरी, मेंढर, नौशेरा, सुंदरबनी आणि अखनूर भागात गोळीबार केला. दहशतवाद्यांनी नियंत्रण रेषेवर (एलओसी) आजूबाजूच्या भागात लहान शस्त्रांनी गोळीबार केला. त्याला भारतीय सैन्याने दुप्पट ताकदीने प्रत्युत्तर दिले.

# धनादेश वाटला नाही, आरोपीस धनादेशाच्या डबल दंडाची व पाच महिने कारावासाची शिक्षा ..ॲड . शशिकांत सावंत

बीड प्रतिनिधी.. दिनांक 3/5/2025 रोजी मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांनी कलम 138 निगोशिएबल इन्स्टुमेंन्ट ऍक्ट अन्वय आरोपी कैलास दत्तात्रय सुरवसे यांना अनादरीत धनादेशाप्रकरणी धनादेशाच्या रकमेच्या डबल दंडाची शिक्षा त्याचप्रमाणे पाच महिन्याचे करावासाची शिक्षा सुनावलेले आहे.. सदर प्रकरणी फिर्यादी परमेश्वर रामभाऊ जमदाडे यांनी मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायालयामध्ये समरी केस नंबर 2643/2015 परमेश्वर विरुद्ध कैलास धनादेशाप्रकरणी प्रकरण दाखल केले होते सदर



प्रकरणांमध्ये आरोपी कैलास सुरवसे यांनी फिर्यादी यांना त्यांच्याकडे असणाऱ्या उसनवार रकमेच्या बदल्यात रक्कम रुपये 180000 चा.धनादेश दिला होता सदरचा धनादेश वटवण्यासाठी बँकेत गेला असता सदरचा धनादेश आरोपीच्या खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने अनादरित झाला होता, म्हणून मा. न्यायालयात खटला दाखल करण्यात आला सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने युक्तिवाद ग्राह्य धरून मा. न्यायालयाने आरोपी कैलास सुरवसे यास धनादेशाच्या डबल रक्कम 360000 रु. उदंड व पाच महिन्यांच्या करावासाची सजा दिलेली आहे, फिर्यादीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली, त्यांना ॲड. अभिषेक बहिर, ॲड. माऊली डाके, ॲड. प्रदीप दराडे, ॲड. राजकुमार धरणे, ॲड. मुकुंद लोणकर, ॲड. राम खोसे यांनी सहकार्य केले

## मविआकडून अजितदादांना मुख्यमंत्रिपदाची ऑफर

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनेकदा मुख्यमंत्रिपदाबाबत वक्तव्य केलं आहे. त्यातून त्यांची मुख्यमंत्रिपदाची इच्छा देखील दिसून येते, दरम्यान त्यांनी पुन्हा एकदा दोन मे रोजी मुख्यमंत्रिपदासंदर्भात एक वक्तव्य केलं होतं, त्यामुळे ते चर्चेत आले. 'मुख्यमंत्रिपदासाठी योग जुळून यावा लागतो. कारण मलाही गेल्या अनेक वर्षांपासून वाटतं की मी मुख्यमंत्री व्हावं. पण कुठे जमतंय," असं अजित पवार यांनी म्हटलं. दरम्यान अजित पवार यांच्या या वक्तव्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी अजित पवार यांना थेट मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे. ते रत्नागिरीमध्ये बोलत होते.नेमकं काय म्हणाले विनायक राऊत? विनायक राऊत यांनी अजित पवार यांना थेट मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे. अजित पवार यांनी महाविकास आघाडीमध्ये यावं, त्यांचे मुख्यमंत्री होण्याचं स्वप्न पूर्ण होईल असं विनायक राऊत यांनी म्हटलं आहे. तसेच एकनाथ शिंदे आणि भाजपमध्ये दुरी वाढत असून शिंदेंना नैराश्य आलं आहे, असा टोलाही यावेळी राऊत यांनी लगावला आहे.

## आम आदमी पार्टीची सुराज्य मोहीम मंगळवारी बीडमध्ये माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड

बीड - आम आदमी पार्टीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सुराज्य मोहीम राबवण्यात येत आहे या बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अँड मनिष मोडक सचिव महाराष्ट्र राज्य . आम आदमी पार्टी व डॉ. अभिजीत मोरे प्रवक्ता आम आदमी पार्टी महाराष्ट्र राज्य यांचें मार्गदर्शन महाराष्ट्रातील येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिल्ह्यातील उद्भवत असणारे प्रश्न नागरिकांशी संवाद कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी



कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढवणे आम आदमी पार्टी शी सर्व सामान्य नागरिकांना जोडण्याचा प्रयत्न करणे आम आदमी पार्टीचे उद्देश कार्यकर्त्यांच्या मार्फत सर्व सामान्य पर्यंत पोहोचवणे या सर्व बाबींवर ती चर्चा करण्यासाठी व पुढील येणाऱ्या निवडणुकांचे नियोजन ठरवण्यासाठी ही मोहीम संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 01 मे. ते 15 मे. 2025 पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये राबवण्यात येत आहे या मोहिमेअंतर्गत 06 मे 2025 रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे सकाळी 11 वाजता कार्यकर्त्यांना व सर्वसामान्य नागरिकांना चर्चा करून मार्गदर्शन केले जाईल तसेच पत्रकार परिषद घेऊन दुपारी 02.00 वाजता बीड येथून स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख सरपंच मसाजोग येथे जाऊन येथील गावकऱ्यांची व देशमुख कुटुंबियांना सांत्वना भेट घेऊन पुढे लातूरकडे रवाना होईल तरी सर्व कार्यकर्ते पदाधिकारी व सर्वसामान्य नागरिकांनी या बैठकीस उपस्थित राहणे अनिवार्य आहे जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान माजी सैनिक अशोक येडे जिह्लाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात येत

## बांधकाम कामगारांनी गृहवस्तू व अत्यावश्यक सुरक्षा संच (पेटी) कॅम्पचा लाभ घ्यावा :-शफिक भाऊ जुनी नगरपरिषद माजलगाव येथे ६ मे रोजी सकाळी १०वाजता होणार कॅम्प

माजलगाव प्रतिनिधी शेख हमीद महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,बीड चे अधिकारी श्री मुंडे सारांच्या वतीने पूर्ण बीड जिल्ह्यात जीवित नोंदणीकृत कामगारांना गृह उपयोगी वस्तू अत्यावश्यक सुरक्षा संच (पेटी) या योजनेचा कॅम्प घेऊन लाभ देण्यात येत



आहे.यामध्ये माजलगाव येथे श्री मुंडे सर यांच्याच मार्गदर्शना खाली दिनांक ६ मे रोजी सकाळी ठीक १०:०० वाजल्यापासून जीवित नोंदणीकृत कामगारांना गृह उपयोगी वस्तू अत्यावश्यक सुरक्षा संच (पेटी) चा कॅम्प घेण्यात येणार आहे.

तरी या कॅम्पमध्ये माजलगाव तालुक्यातील संपूर्ण जीवित नोंदणी कृत बांधकाम कामगार लाभार्थीने या योजनेचा लाभ घ्यावा व कोणीही बांधकाम कामगार या योजनेतून वंचित राहूनय म्हणून बांधकाम मजूर संघटनाचे जिह्ला उपाध्यक्ष शेख हमीद (शफिक भाऊ) यांनी बातमीच्या मध्येमातून कामगारांना सांगितले.

# प्रकल्प संचालिका संगीता देवी पाटील म्हणजे मला पहा फुल वाहा शासनाचा निधी ओम भट स्वाहा

:

माजलगाव (प्रतिनिधी) बीड जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण विकास योजनेच्या प्रकल्प संचालिका संगीता देवी पाटील म्हणजे मला पहा फुले वाहा आणि आणि शासनाचा निधी ओम भट स्वाहा वाहा या अवस्थेनुसार काम करताना दिसत आहेत

गेल्या महिनाभरापूर्वी संगीता देवी पाटील यांनी ईद आणि गुढीपाडव्यानिमित्त महिला बचत गटाचे मेळावे भरवले यामध्ये गुढीपाडव्यानिमित्त जिल्हा परिषदेच्या ग्राउंड अंतर्गत पालकडे ग्राहक फिरकलाच नाही यामुळे ज्या महिला बचत गटांनी इथे स्टॉल लावले होते त्यांची पूर्णतः संगीता देवी पाटील यांनी फसवणूक केल्याचे दिसून आले चार दिवस उलटून गेले तरीही पाच हजार रुपयांचा व्यवसाय न झाल्याची खंत सदर महिला बचत गटाच्या व्यावसायिकांनी व्यक्त केली आम्ही ज्यावेळी दुपारी वृत्तसंकलणासाठी जिल्हा परिषदेच्या आवारात पोहोचलो त्यावेळी तिथे ग्राहक तर नव्हतेच मात्र जिल्हा परिषदेने निर्माण केलेल्या शो साठीच्या कारंजामध्ये जनावर पाणी पिताना दिसत होते त्यामुळे आम्ही महिला बचत गटाच्या स्टॉलमध्ये संपर्क साधला असता जिल्हा परिषदेने आमची सरळ सरळ फसवणूक केल्याचे बोलून दाखविले जिल्हा परिषदेचा गुढीपाडवा एकदम फेल गेल्याची सांगितलं जिल्हा परिषदेने आयोजित केलेली ईद नाही आणि गुढीपाडवा

पंतप्रधान घरकुल योजनेअंतर्गत प्रायोगिक तत्त्वावर नियुक्त केलेले इंजिनीयर पदावर असलेले कर्मचारी घरकुल बांधायचे असले तरीही हप्त्यासाठी पैसे मागतात आणि घरकुल बांधायचे नसले तरीही ठराविक एक रकमे रक्कम मागतात यामुळे खरे लाभार्थी अडचणीत येत आहेत आणि खोटारडे आपले पोळी भाजून घेत आहेत याबाबतही संगीता देवी पाटील यांना विचारणा केली असता यांनी पुराव्याची मागणी केली मात्र सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेल्या संगीता देवी पाटील यांना ग्रामीण भागातील योजना अवघड जागेवरच दुखणं का समजत नाही आम्ही तक्रार करावी तर घरकुलाचे हप्ते मिळणार नाहीत आम्ही तक्रार करावी तर बोगस घरकुल मिळणार नाही अशी अडचण असतानाही जर पाटील मॅडम पुरावाच मागणार असतील तर तुमचे भ्रष्ट प्रशासन तुम्हाला लखलाभ

ही नाही लोकांनी मीना बाजार मध्ये जाणे पसंद केले यामुळे संगीता देवी पाटील आपण कुठे कमी पडला आहात याचा आत्मपरीक्षण करा का शासनाचा निधी आला आणि उडून दिला असा प्रत्येक तर तुमचा नाही ना, संगीता देवी पाटील म्हणजे अनेक पत्रकारांची मैत्रीण यांच्या विरोधात महिला म्हणून कोणी आवाज उठवायचा नाही यांनी मात्र जिल्हाभरातील कुरण फस्त केल्याशिवाय राहायचं नाही असा प्रकार बीड जिल्ह्यात चालू असल्यामुळे पत्रकाराचे शिष्टमंडळ पालकमंत्री अजित पवारांची भेट घेऊन पंतप्रधान घरकुल आवास योजना आणि महिला बचत गट प्रोत्साहन निधीबाबत चौकशी करण्यासाठी लवकरच भेट घेणार आहे

## बीड जिल्ह्याचा पालकमंत्री अजित पवार असून अडचण नसून खो ळंबा

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार झाल्याने बीड जिल्ह्याच्या अशा पल्लवीत झाल्या होत्या ज्याप्रमाणे पुणे बारामती चे प्रशासन चालते त्यानुसार बीड जिल्ह्यातील प्रशासन चालवून भ्रष्टाचार मुक्त प्रशासन जिल्ह्याला पाहायला मिळेल अशी अपेक्षा होती मात्र बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुणे आणि बारामती प्रेम झाकून राहिलेले नाही डोळ्यावर पापणी वडून स्वीकारले बीड जिल्ह्याची पालकमंत्री पद वाऱ्यावर सोडून अजित पवार पुणे आणि बारामती भागातच मग न दिसणारे पालक मंत्री म्हणून आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून जो अजित दादांचा अरे बाबा आणि वचक प्रशासनावर पाहायला मिळाला तो मात्र बीड जिल्ह्यात मूग गिळून गप्प बसल्याचा दिसून आला यामुळे बाहेरचा पालकमंत्री म्हणजे असून अडचण आणि नसून खोळंबा याचा प्रत्यय बीड जिल्ह्याला क्षणोक्षणी पाहायला मिळत आहे

## संपादकीय

# जाती म्हणजे बंदिस्त वर्ग

जात वास्तव हे भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाती म्हणजे बंदिस्त वर्ग असल्याचे म्हटले होते. भारतीय उपखंडात जातनिहाय सामाजिक व्यवहारांसोबतच आर्थिक स्तराची वैशिष्ट्यपूर्ण उतरंड देखील जातनिहायच असलेली दिसते. त्यामुळे सद्य परिस्थितीत भारतातील जातींची आर्थिक, सामाजिक परिस्थिती नेमकी काय आहे, हे जोखण्यासाठी संपूर्ण देशात जातनिहाय जनगणना आवश्यक आहे. केंद्र सरकारचे अर्थ, कामगार, महिला व बालविकास, समाजकल्याण आदी खात्यांद्वारे होणाऱ्या सर्वेक्षणांमधून समोर येणाऱ्या सांख्यिकीद्वारे जी माहिती मिळते, त्यात या जनगणनेमुळे मोलाची भर पडणार आहे. त्यामुळे बुधवारी केंद्र सरकारच्या राजकीय व्यवहार समितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व इतर नेत्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत करायला हवे. ही मागणी देशात मंडल आयोग लागू झाल्यानंतर उत्तर भारतातील ओबीसी जनाधार असलेल्या पक्षांकडून सातत्याने केली जात आहे. यात प्रामुख्याने लालूप्रसाद यादव, नितीश कुमार, मुलायमसिंह ही नावे असली तरी गेले काही दिवस कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी देखील हिरीरीने ही मागणी लावून धरली आहे, तर यातून भारतीय समाज दुभंगला जाण्याची भीती व्यक्त करत ती धुडकावून लावण्याचे काम भाजप नेतृत्व सातत्याने करत आले होते. त्यामुळे अचानक घेतलेल्या या निर्णयामागील राजकीय गणिते व हेतू समजून घेणे गरजेचे आहे. नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीस देशाने खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेत जसे मूलगामी बदल झाले तसेच सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जडणघडणीवरही त्याचे दूरगामी परिणाम झाले. भारतीय बाजारपेठ जागतिक स्तरावर खुली झाली. त्यातून नवे उद्योग आले आणि पूर्वी निम्न मध्यमवर्गाच्या जवळ असणारा मध्यमवर्ग श्रीमंत वर्गाच्या शेजारी जाऊन बसला. नव्या गलेलठ्ठ पगारांच्या नोकऱ्या व त्यासाठी गरजेचे असणारे शैक्षणिक धोरण तयार झाले. अगदी शिक्षणापासून ते वैद्यकीय सेवांपर्यंत सरकारची जबाबदारी कमी होत गेली. खासगीकरण म्हणजेच विकास व त्याला पूरक धोरण म्हणजे विकासाभिमुख सरकार, असा एक समज घडवला गेला. दुसऱ्या बाजूला निम्न स्तरावरील जनतेत मोठी उलथापालथ झाली. भारतातील बहुतांश समाज हा शेती व त्यावर आधारित व्यवसायांशी संबंधित होता. नव्या आर्थिक धोरणात देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषीबाबत कोणतेही मूलगामी धोरण ठरवले गेले नाही. त्यातून कृषक जातींसमोर मोठे आर्थिक, सामाजिक आव्हान उभे राहिले. या जातींमधील नेतृत्वाला आरक्षण हाच एकमेव हुकमी मार्ग दिसू लागला. महाराष्ट्रात मराठा, उत्तर भारतात जाट, गुजरातेत पाटीदार, आंध्र प्रदेशात कापू आदी शेतकरी जातींमधून आरक्षणाच्या मागण्या होऊ लागल्या. या जातींचा समावेश इतर मागासवर्गीयांमध्ये केल्यास आमचे काय होईल, अशी भीती ओबीसी जातींमधून व्यक्त होऊ लागली. त्यातच इतर मागासवर्गीयांमधील गुज्जर, धनगर आदी जातींमधून त्यांचा समावेश अनुसूचित जमातीत करण्याच्या जोरदार मागण्या होऊ लागल्या. देशात अनुसूचित जाती, जमाती व ओबीसी असे एकूण ४९.५० टक्के आरक्षण देण्याची तरतूद आहे. आरक्षणाचा हा टक्का पन्नास टक्क्यांच्या वर जाऊ नये, असे निर्देश इंदिरा सहानी यांनी मंडल आयोग लागू करण्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या आव्हानावर निकाल देताना न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे नव्या जातींपुढे उभ्या राहिलेल्या आर्थिक आव्हानांची उपाययोजना आरक्षणातून होऊ शकते, असे कुणाला कितीही वाटले तरी ठरलेल्या टक्केवारीच्या पुढे जाता येणे सध्या शक्य नाही. देशभरात कुठल्या जातीची टक्केवारी किती, ओबीसींची एकूण संख्या किती व त्यातील कोणत्या जातींचा आर्थिक, सामाजिक स्तर आरक्षणातून उंचावला आहे किंवा कसे, हे समजण्याकरिता ही जनगणना उपयोगी ठरणार आहे. अर्थात या जनगणनेचे निकष कोणते असणार, या कळीच्या मुद्द्याबरोबरच यातून समोर येणारी आकडेवारी जनतेसमोर ठेवण्याचे धैर्य सरकार दाखवणार का, हे देखील अत्यंत महत्त्वाचे असणार आहे. यापूर्वी २०११मध्ये मनमोहन सिंग सरकारने केलेली सामाजिक आर्थिक आणि जातगणना असो वा बिहार, तेलंगण, कर्नाटक या राज्यांमध्ये झालेले जात सर्वेक्षण, संपूर्ण आकडेवारी जनतेसमोर ठेवण्याचे धैर्य ना राहुल गांधी यांनी दाखवले, ना नितीश-लालूंच्या पक्षाने.

# मोबाईलने बालपण हिरावून; मानवी दिनचर्येवर घणाघाती प्रहार केला

आपण म्हणतो बालपण देगा देवा!परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुध्दा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे. एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते. यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे.सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात. स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते.आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटो-न-घंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे.शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थ्यांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे. मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो. परिणामी, मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल एक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) किंवा सिरीयल पहाण्यात मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते. यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही. डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल एक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे.म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून एक्टिव नसल्याचे दिसून येते. म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसें दिवस मानवाच्या दृष्टीकोनातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही. म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही. मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक) होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा टॅक अथवा लकवा किंवा ब्रेन टॅक असेही म्हणतात. देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते.ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास, मानसिक त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही.त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे. मानवाला मोबाईलमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईलमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा. अमेरिकन केडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात. आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो. आज आपण पहातो ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले मुली टीव्ही पहाताना, जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात. जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो.छोटे मुलं रडायला लागले की आई वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे.त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल एक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे. अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो.त्यापेक्षा हजारो पटीने आपल्याला यातना किंवा दुःख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थ्यांना शारिरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते कहा गये ओ दिन.

# हे एक फळ बारा महिने रोज खा व भरपूर जगा, पोट होईल साफ, हार्ट अटॅकचा धोका टळेल, रक्त शुद्ध व २०६ हाडं होतील लोखंडी

मुंबई-आपण निरोगी राहण्यासाठी फळे खाण्याची सवय लावतो, पण काही विशिष्ट फळे आपल्या शरीरावर इतके चांगले परिणाम करतात की त्यांचं रोजचं सेवन आवश्यक ठरतं. असेच एक फळ म्हणजे अंजीर. दिसायला साधं पण बहुगुणांनी भरलेलं हे फळ प्राचीन काळापासून आयुर्वेदात उपयुक्त मानलं गेलं आहे. अंजीर सुकवून खाल्लं तरी त्याचे पोषणमूल्य टिकून राहतं आणि ते सहजपणे साठवून ठेवता येतं. दररोज २-३ सुकवलेले अंजीर पाण्यात भिजवून खाल्ले तर शरीरात रक्ताची वाढ, पचनक्रिया सुधारणा, हाडं मजबूत होणं यांसारखे फायदे होतात. अंजीरामध्ये फायबर, अँटीऑक्सिडंट्स, आयरन, पोटॅशियम, कॅल्शियम आणि बी कॉम्प्लेक्स जीवनसत्त्वं भरपूर प्रमाणात असतात. म्हणूनच ते वजन कमी करणारे, हृदयासाठी उपयुक्त आणि मधुमेह नियंत्रणात ठेवणारे अन्न म्हणून ओळखले जाते. अंजीर रोज खाल्ल्यास कोणकोणते फायदे होतात, ते जाणून घ्या. पचनक्रि या सुधारते पचनक्रि या सुधारते पचनक्रि या सुधारते पचनक्रि या सुधारते पचनक्रि या सुधारते आणि बद्धकोष्ठता संपते-आणि बद्धकोष्ठता संपते-आणि बद्धकोष्ठता संपते-आणि बद्धकोष्ठता संपते-आणि बद्धकोष्ठता संपते अंजीरामध्ये नैसर्गिक फायबर भरपूर प्रमाणात असतं. त्यामुळे जे लोक बद्धकोष्ठतेमुळे त्रस्त आहेत, त्यांनी रोज सकाळी २ भिजवलेले अंजीर खाल्ल्यास पचनक्रिया सुधारते. पोट साफ होण्यास मदत होते, गॅस, ॲसिडिटीसारख्या समस्या दूर राहतात. हृदयाचे आरो ग्य हृदयाचे आरो ग्य हृदयाचे आरो ग्य हृदयाचे आरो ग्य हृदयाचे आरो ग्य सुधारते-सुधारते-सुधारते-सुधारते-सुधारते-अंजीरातील अँटीऑक्सिडंट्स आणि पोटॅशियममुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहतो. त्यामुळे रक्तदाब संतुलित राहतो आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. दररोज अंजीर खाल्ल्याने रक्तवाहिन्यांची कार्यक्षमता वाढते आणि संपूर्ण हृदयसंस्थेला बळकटी मिळते. हाडं आणि सांधे मजबूत हाडं आणि सांधे मजबूत हाडं आणि सांधे मजबूत हाडं आणि सांधे मजबूत हाडं आणि सांधे मजबूत होतात-होतात-होतात-होतात-होतात-अंजीर हे नैसर्गिक कॅल्शियमचा चांगला स्रोत आहे. त्यामुळे हाडं मजबूत ठेवण्यासाठी अंजीर उपयुक्त ठरतं. हाडांची घनता टिकवण्यासाठी आणि सांध्यांमधील सूज कमी करण्यासाठी अंजीर फायदेशीर मानलं जातं. वृद्धांमध्ये होणाऱ्या ऑस्टिओपोरोसिसचा धोका देखील यामुळे कमी होतो. रक्तशुद्धी व हिमोग्लोबिन रक्तशुद्धी व हिमोग्लोबिन रक्तशुद्धी व हिमोग्लोबिन रक्तशुद्धी व हिमोग्लोबिन रक्तशुद्धी व हिमोग्लोबिन वाढवते-वाढवते-वाढवते-वाढवते-वाढवते-अंजीरात आयरन आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असल्यामुळे ते रक्तशुद्ध करतं. ज्यांचं हिमोग्लोबिन कमी आहे, अशा लोकांनी अंजीर खाल्ल्यास रक्तात लाल पेशी वाढतात. थकवा, चक्कर येणे अशा लक्षणांपासून आराम मिळतो. महिलांसाठी तर हे एक आदर्श फळ मानलं जातं. त्वचा आणि केसांचे त्वचा आणि केसांचे त्वचा आणि केसांचे त्वचा आणि केसांचे त्वचा आणि केसांचे आरोग्य राखते-आरोग्य राखते-आरोग्य राखते-आरोग्य राखते-आरोग्य राखते-अंजीरातील अँटीऑक्सिडंट्स शरीरातल्या फ्री-रॅडिकल्सना नियंत्रित करतात, ज्यामुळे त्वचेवर सुरकुत्या, डाग, टोकटपणा कमी होतो. त्वचा उजळते आणि केसांची वाढ चांगली होते. केस गळती कमी होण्यासाठी अंजीर खाणं उपयुक्त ठरतं. अंजीर दिसायला लहानसा वाटला, तरी त्याचे फायदे खूप मोठे आहेत. दिवसाची सुरुवात अंजीराने करणे ही एक उत्तम सवय ठरते. निरोगी राहण्यासाठी कोणत्याही वयातील व्यक्तीने रोज २-३ अंजीर खाणं गरजेचं आहे.

# सद्भावनेची मशाल तेवत राहिली पाहिजे- कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

परळी-प्रतिनिधी दिवसेंदिवस बिघडत चाललेला सामाजिक व जातीय सलोखा अबाधित राहावा या उद्देशाने महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या वतीने मागच्या काही दिवसांपासून सद्भावना अभियान सुरू करण्यात आलेले आहे. आणि त्याच अनुषंगाने परळी मध्ये सुमारे चार तास सद्भावना सत्याग्रह करून सद्भावना वाढीसाठी प्रयत्न करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या संकल्पनेतून वाढत चाललेल्या सामाजिक व जातीय प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्रात सद्भावना वाढणे गरजेचे असल्याची संकल्पना मांडली. आणि त्यानुसार सद्भावना अभियानांतर्गत मागच्या कांही दिवसांपूर्वी मस्साजोग ते बीड पायी रॅली काढण्यात आली होती, आणि प्रतिसादही उत्स्फूर्त मिळाला होता. तर दुसऱ्या टप्प्यात परळी वैजनाथ येथे सद्भावना सत्याग्रहाचे आयोजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे नियोजन स्वा.रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा कॉंग्रेसच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, युवानेते आदित्य पाटील,उपाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे, शहराध्यक्ष बहादूर भाई तसेच कॉंग्रेसच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी केले. शनिवार दिनांक ३ मे रोजी परळी शहरातील मोंढा मैदान येथे सदरील सदभावना सत्याग्रहाचे आयोजन सकाळी दहा वाजता करण्यात एके होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांना अभिवादन करून वंदे मातरम ने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आणि यावेळी पहलगाम येथे निष्पापणे बळी गेलेल्या भारतीय नागरिकांना श्रद्धांजलीही अर्पण करण्यात आली. यानंतर सुमारे चार तास अतिशय शांततेमध्ये सत्याग्रह सुरू करण्यात आला. यावेळी शेकडो नागरिकांची उपस्थिती होती. समारोपप्रसंगी कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी आणि महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे प्रभारी कुणाल चौधरी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आपले विचार मांडले.



त्यांनी बीड जिल्ह्यामध्ये जो काही सामाजिक आणि जातीय सलोखा बिघडलेला आहे त्यावर एकमेव उपाय म्हणजे प्रत्येकाच्या मनामध्ये सद्भावना वाढली पाहिजे सद्भावनेच्या दुधामध्ये जणूकाही बीडने मिठाचा खडा टाकावा अशी सध्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. प्रत्येक नागरिकाला शांतता हवी आहे मात्र बीड जिल्ह्यामध्ये अतिशय विदारक चित्र निर्माण झाले असून यावर कुणीतरी पुढाकार घेणे गरजेचे होते. आणि म्हणून महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसने सद्भावना वाढीसाठी सद्भावना अभियान सुरू केलेले आहे. सद्भावना सत्याग्रहामध्ये जे नागरिक सहभागी झाले ते अतिशय उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले आहेत. आणि सत्याग्रहाचे आयोजनही बीड जिल्हा कॉंग्रेसचे पदाधिकारी तसेच परळी शहरातील कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी अतिशय उत्कृष्ट केले असेही ते म्हणाले. आपल्या विस्तृत भाषणामध्ये अनेक मुद्द्यांना स्पर्श करत हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित नागरिकांना मौलिक विचार दिले. आणि प्रत्येकानी सद्भावना वाढीस लागावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही मत व्यक्त केले. सदरील कॉंग्रेसचे प्रभारी कुणाल चौधरी, माजी आमदार मोहन जोशी, बीड जिल्हा प्रभारी अमर खानापुरे, युवानेते आदित्य पाटील, नवनाथ थोटे, प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील, प्रविकुमार शेप, पशुपतीनाथ दांगट, बाळासाहेब ठोंबरे यांच्यासह कॉंग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत तसेच तुकडोजी महाराजांच्या संगीतमय विचाराने करण्यात आली.

# युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित



माजलगाल-प्रतिनिधी बीड जिल्हा परिषदेचे माजी सभापती युवा नेते व लोकनेते सुंदर रावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन जयसिंग भैय्या सोळंके यांना मराठवाडा आयकॉन हा नवभारत -नवराष्ट्र वर्तमान समुहाचे वतीने दिनांक ३/५/ २०२५ रोजी देण्यात आला. महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री स्व.लोकनेते सुंदरराव्जी सोळंके यांचे ते नातू असून त्यांनी पंचायत समिती सभापती जिल्हा परिषद सभापती ते लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन यासह विविध सामाजिक राजकीय क्षेत्रामध्ये काम करून युवकांसमोर एक आदर्श निर्माण करून दिलेला असून या त्यांच्या कतुृत्वाबद्दल जयसिंग भैया सोळंके यांना छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा आयकॉन या पुरस्काराने संजय सिरसाठ साहेब, सामाजिक न्यायमंत्री, अतुल सावे साहेब बहुजन कल्याण मंत्री, विक्रम काळे यांच्या हस्ते आपल्या कारखान्याचे उपाध्यक्ष जयसिंगभैय्या सोळंके यांना सन्मानित करण्यात आले. हा मराठवाडा आयकॉन पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ५ मे २०२५
https://lokaarambh.com



## तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



बीड-प्रतिनिधी येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम, महात्मा गांधी आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर, सकाळी ७:३० वाजता शाळेच्या प्राचार्या सौ.उमा जगतकर मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताने मानवंदना देण्यात आली. या उत्सवी कार्यक्रमात शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# खोऱ्याचा दांडा डोक्यात घालून जन्मदात्या बापाने पोटच्या पोराला संपवल



माजलगाव जवळील खानापुर येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. जन्मदात्या बापानेच आपल्या मुलाची हत्या केली असल्याची घटना समोर आली आहे. रोहित (काळु) गोपाळ कांबळे या २० वर्षीय तरुणाची बापानेच हत्या केल्याची घटना समोर आली आहे. दारू पिऊन मुलगा त्रास देत असल्याने गोपाळ विठ्ठल कांबळे यांनी मुलगा रोहितची हत्या केली आहे, राहत्या घरातच खोऱ्याचा दांडा डोक्यात घालून त्याचा खून केला आहे. घटनेची माहिती मिळताच माजलगाव शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मात्र, मुलाच्या डोक्यात खोऱ्याचा दांडा घालून त्याला मारल्यानंतर आरोपी वडील घटनास्थळाहून थेट पोलिस ठाण्यात हजर झाले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दारूसाठी आईला आणि चुलतीला संपवल्याच्या घटना देखील बीडमध्ये समोर आल्या आहेत. अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा येथे देखील अशीच एक घटना समोर आली आहे. रात्री बारा वाजताच्या सुमारास अमृत भानुदास सोन्नर (वय ४५) याने आपल्या आई चोत्राबाई भानुदास सोन्नर यांचा दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणामुळे वाद घालून मारहाण करून दगडाने ठेचून खून केल्याची घटना घडली आहे. आरोपी अमृतला दारूचं व्यसन होतं, त्याच्या दारूला आणि त्रासाला कंटाळून काही दिवसांपूर्वी त्याची पत्नी मुलांसह आपल्या माहेरी निघून गेली होती. त्या रात्री आई व मुलगा दोघेच घरी असताना, अमृतने आईकडे दारूसाठी पैसे मागितले. पैसे न दिल्याच्या रागाच्या भरात त्याने आईचा जीव घेतला. जबर मारहाणीमुळे रक्तस्राव होऊन आईचा जागीच मृत्यू झाला. अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी अमृतला अटक केली आहे. बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील कावळ्याची वाडी येथे १ मे रोजी संध्याकाळी ६ वाजता ही घटना घडली आहे. चंद्रकांत धुराजी कावळे (वय २५) याने आपल्या चुलती परिमाला बाबुराव कावळे (वय ६५) यांच्याकडे दारूसाठी पैसे मागितले. चुलतीने पैसे न दिल्याने संतापून त्याने घरात असलेल्या कुऱ्हाडीने सपासप वार केले. डोक्यावर आणि अंगावर गंभीर वार झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. हत्या केल्यानंतर नराधम आरोपी चंद्रकांतने घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरु आहे.

## अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत अशोक दुधाळ यांची शिवसेना

बीड-प्रतिनिधी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा.डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी / व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना बीड जिल्हाप्रमुख मा. अनिल दादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत, ओबीसी / व्हिजेएनटी सेल जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून पार पडली. अशोक दुधाळ हे सामाजिक प्रश्नांवर सातत्याने काम करणारे कार्यकर्ते असून, ओबीसी व व्हिजेएनटी समाजाच्या हक्कांसाठी नेहमी पुढाकार घेत आले आहेत. त्यांच्या या नियुक्तीमुळे स्थानिक पातळीवर ओबीसी आणि व्हिजेएनटी समाजाला नवी दिशा व बळ मिळेल, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची निष्ठा व संघटन कौशल्य, तसेच शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा वारसा हे प्रेरणास्थान मानून, अशोक दुधाळ हे पक्षवाढीच्या कामात स्वतःला झोकून देतील आणि सर्व घटकांना बरोबर घेऊन प्रभावीपणे कार्य करतील, अशी अपेक्षा वरिष्ठ नेतृत्वाकडून व्यक्त करण्यात आली आहे. नियुक्तीनंतर अशोक दुधाळ यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ही जबाबदारी मोठी असून, पक्ष नेतृत्वाने दाखवलेल्या विश्वासाला मी पात्र ठरेल. समाजाच्या न्याय हक्कांसाठी मी संघर्ष करत राहीन आणि शिवसेनेच्या ध्येयधोरणांनुसार कार्य करीन.

## निधन वार्ता

माजलगाव (प्रतिनिधी) : तालुक्यातील उमरी बु. येथील रहिवासी असलेले उत्तमराव भागूजी घायतिडकव य ९५ वर्षे यांचे अल्पशा आजाराने आज दि.०२ मे २०२५ रोजी सायंकाळी ०६:३० निधन झाले. ते माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आसाराम घायतिडक यांचे वडील होते उत्तमराव घायतिडक हे या अतिशय धार्मिक प्रवृत्तीचे व मितभाषी शेतकरी म्हणून सर्व परिचित होते त्यांच्या पार्थिव देहावर उमरी बु. येथे रात्री ०९:१५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत त्यांच्या पाश्चात्य एक मुलगा,एक मुलगी, सुना, नातवंडे, असा परिवार आहेतालुक्यातील उमरी बु. येथील रहिवासी असलेले उत्तमराव भागूजी घायतिडकव य ९५ वर्षे यांचे अल्पशा आजाराने आज दि.०२ मे २०२५ रोजी सायंकाळी ०६:३० निधन झाले. ते माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आसाराम घायतिडक यांचे वडील होते उत्तमराव घायतिडक हे या अतिशय धार्मिक प्रवृत्तीचे व मितभाषी शेतकरी म्हणून सर्व परिचित होते त्यांच्या पार्थिव देहावर उमरी बु. येथे रात्री ०९:१५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत त्यांच्या पाश्चात्य एक मुलगा,एक मुलगी, सुना, नातवंडे, असा परिवार आहे

## नामदेव महाराज शास्त्री यांचे बडेवाडीत बुधवारी आशिर्वचन



दिंद्रुड प्रतिनिधी माजलगाव तालुक्यातील बडेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाला बुधवारी सुरूवात होत आहे.या निमित्त श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ. न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांच्या आशीर्वचन कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी सायंकाळी करण्यात आले आहे. बडेवाडी येथे मागील काही वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताह तथा ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण,श्रीमद भागवत कथा व किर्तन महोत्सवाचे आयोजन वैशाख महिन्यात करण्यात येते. या धार्मिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत ह.भ.प.डॉ. नामदेव महाराज शास्त्री बुधवारी अखंड हरिनाम सप्ताह निमित्त बडेवाडी आशीर्वचन कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत,नित्रुड येथून डॉ.नामदेव शास्त्री यांची मिरवणूक होणार आहे. भाविक भक्तांची सायंकाळी ४ वाजता पायी पदयात्रा टाळ मृदंगाच्या निनादात काढण्यात येईल. सायंकाळी ६ वाजे दरम्यान बडेवाडी येथे भाविक भक्तांना डॉ.नामदेव महाराज शास्त्री आशीर्वचन देतील. या कार्यक्रमानंतर रात्रौ ९ वाजता विनोदाचार्य प्रकाश महाराज साठे यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन श्री संत भगवान बाबा तरुण मित्र मंडळ व समस्त गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# देशातील ५ मोठ्या बँकांना आरबीआयचा दणका, नियमांचे पालन न केल्यानं लाखो रुपयांचा दंड



नवी दिल्ली। वृत्तसंस्था देशातील ५ मोठ्या बँकांवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने कारवाई केली आहे. पाच बँकांना लाखो रुपयांचा दंड ठोठावला आहे. यामध्ये देशातील आघाडीच्या आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, आयडीबीआय बँक, बँक ऑफ बडोदा आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांचा समावेश आहे. कोणत्या बँकेवर किती दंड आकारण्यात आला याबाबतची सविस्तर माहिती पाहुयात. आयसीआयसीआय बँकेला ९७.२० लाखांचा दंड देशातील सर्वात मोठ्या खासगी बँकांपैकी एक असलेल्या आयसीआयसीआय बँकेला आरबीआयने एकूण ९७.२० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. सायबर सुरक्षा फ्रेमवर्क, केवायसी, क्रेडिट आणि डेबिट कार्डवरील काही सूचनांचे पालन न केल्याबद्दल आयसीआयसीआय बँकेवर हा दंड ठोठावण्यात आला आहे. ॲक्सिस बँकेला २९.६० लाख रुपयांचा दंड देशातील सर्वात मोठ्या खाजगी बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेला आरबीआयने २९.६० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. ऑफिस खात्यांच्या अनधिकृत कामकाजाबाबत आरबीआयच्या सूचनांचे पालन न केल्याबद्दल ॲक्सिस बँकेवर हा दंड ठोठावण्यात आला आहे. आयडीबीआय बँकेला ३१.८ लाख रुपयांचा दंड आरबीआयने आयडीबीआय बँकेला एकूण ३१.८ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. किसान क्रे डिट कार्ड द्वारे शेती आणि संबंधित कामांसाठी दिलेल्या अल्पकालीन कर्जावरील व्याज अनुदानाशी संबंधित सूचनांचे पालन न केल्याबद्दल आयडीबीआय बँकेवर हा दंड ठोठावण्यात आला आहे. बँक ऑफ बडोदाला ६१.४० लाख रुपयांचा दंड बँक ऑफ बडोदाला आरबीआयने एकूण ६१.४० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. बँकेत असलेल्या वित्तीय सेवा आणि ग्राहक सेवा काउंटरवर जारी केलेल्या सूचनांचे पालन न केल्याबद्दल बीओबीवर हा दंड ठोठावण्यात आला आहे. बँक ऑफ महाराष्ट्रला ३१.८० लाख रुपयांचा दंड आरबीआयने बँक ऑफ महाराष्ट्रला एकूण ३१.८० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. केवायसीशी संबंधित सूचनांचे पालन न केल्याबद्दल बँक ऑफ महाराष्ट्रवर हा दंड ठोठावण्यात आला आहे.

## जागतिक हास्य दिनानिमित्त !!??

०४ मे २०२५

आपले भारतीय डॉ मदन कटारिया साहेबांनी
रुग्णांच्या तपासा अंती आले लक्षात
शारीरिक पेक्षा मनाने तणाव असे रुग्ण
घेई त्यांस उपचाराती हास्य योग पक्षात

सांगे हास्याचे अनेक फायदे
रुग्णांना बरे करणे हि असे तळमळ
सकाळ सकाळी चौपाटीवर बागाईत दिसे
हास्य क्लबची पसरे ही दिसे यशस्वी चळवळ

महागाईत रुग्णांना मोफत मिळे हे औषध
ताणतणाव दूर होई स्नायू मोकळे
प्रतिकूल परिस्थितीशी मात घेई शक्ती
बुद्धी तल्लख होई मन मोकळे

पहा विनोदी चित्रपट- मालिका, वाचा कथा
घरात छान जगा जास्त काळ जगा
चिंताग्रस्त प्रगत देश अपवाद नसे
हसमुखाने वाढे मैत्री नसे त्यात दगा

असे अनेक प्रकार हसण्यावारी
स्मित- खळखळून नी गाल्यातल्या गालात
समोरच्या मैत्री- नात्यातील मूड पहा
नाही तर बसे गाल्यातल्या गालात

विनोदी अभिनेता चार्ली चॅप्लिन सांगे
ज्या दिवशी ना हसे तो दिस वाया
हसल्याने आजार राही नियंत्रणात
दिसे चेहरा टवटवी मिळे तुकतुकीत काया

हास्य हे मैत्री चं प्रतीक आहे !

आज जागतिक हास्य २७वा दिनानिमित्त आपणास हार्दिक हार्दिक
'हास्यमय' शुभ शुभेच्छाऽऽऽ !!

~@ शब्दमहर्षी विलास देवळेकर

# शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती व नवोपक्रम स्पर्धेत संभाजीनगर जिल्हास्तरावर बीडच्या प्राजक्ता मोरे यांचे दुहेरी यश



बीड (प्रतिनिधी):- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजित जिल्हास्तरीय शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरावर इयत्ता 6 ते 8 विषय इंग्रजीमध्ये प्रथम पारितोषिक व शैक्षणिक नव उपक्रम स्पर्धा (इंग्लिश स्टडी एक्सप्रेस) या उपक्रमांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरावर द्वितीय पारितोषिक जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रीय शाळा मोहरा तालुका गंगापूर येथील शिक्षिका आणि बीड येथील रहिवाशी श्रीमती प्राजक्ता भगवान मोरे यांनी दैदिप्यमान यश प्राप्त केल्याबद्दल शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित बक्षीस वितरण प्रसंगी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, प्राचार्य श्रीमती सानवी देशमुख, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये श्रीमती प्राजक्ता भगवान मोरे यांचा प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षण अधिकारी माध्यमिक अश्विनी लाटकर, केंद्रप्रमुख डी.टी. शिंदे, मुख्याध्यापक चौधरी सर, शिक्षण विभाग प्रमुख प्रकाश माटे आणि या विद्यालयातील सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले असून भविष्यकालीन यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. शैक्षणिक स्पर्धा शिक्षकांच्या नवनिर्मितीच्या क्षमतेला गती देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्याधुनिक उपक्रमाला चालना देण्यासाठी उपयुक्त असल्याचे मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले आहे. श्रीमती प्राजक्ता भगवान मोरे या वाल्मीक शंकरराव वाघमारे यांच्या स्नुशा आणि सचिन वाल्मिक वाघमारे यांच्या सुविद्य पत्नी आहेत. श्रीमती प्राजक्ता भगवान मोरे यांच्या दुहेरी यशाबद्दल त्यांचे हितचिंतक, आप्त स्वकीय यांनी अभिनंदन केले असून याचे व्यापक स्तरावर सर्वत्र स्वागत केले जात आहे.

# हिमायत फाऊंडेशनच्या नावावर जमा केलेला पैसा स्वताच्या खात्यात वर्ग !

दहशतवादी विरोधी पथक छत्रपती संभाजी नगर येथील पथकाने गेवराई शहरातील तरुणावर गुन्हा दाखल केला आहे पॅलेस्टाईन,गाझा,मधील लोकांना मदत करण्याच्या हेतुने पैसा गोळा करत असलेल्या गेवराई तील तरुनावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्यामुळे संबंधीत सामाजिक कार्यकरणारी हिमायत फोंडेशन संस्था अडचणीत आली आहे बीड जिल्ह्यात वेगवेगळ्या सेवाभावी संस्थेची माहिती राष्ट्रीय सुरक्षेच्या हेतूने दहशतवादी पथक घेत आसते अशाच प्रकारे माहितीत गेवराईतील दिनांक २४.४.२०२४ रोजी स्थापन झालेली हिमायत फाउंडेशन , रजिस्ट्रेशन क्रमांक बीड / ०००००३०२/२०२४ , धर्मदाय कडील नोंदणी क्रमांक ऋ- २८१३६ संस्थेची माहिती, दहशद वाद विरोधी पथकाने धर्मादाय आयुक्त यांच्याकडून घेतली त्यामध्ये संस्था सामाजिक कार्य व त्यांच्या अनुषंगाने वेगवेगळे ७० उद्देशाप्रमाणे काम करण्यासाठी स्थापन केली असल्याचे सांगण्यात आले. संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य आहे , फाउंडेशनच्या सोशल मीडिया फेसबुक इंस्टाग्राम अकाउंट पथकाने पडताळणी केली असता यामध्ये हिमायत फाउंडेशनचे अध्यक्ष पॅलेस्टाईन व गाझा मधील बाधित लोकांना मदत करणाऱ्यांना पाठिंबा देण्याचा दावा करून निधी उभारत असल्याचे दिसून आले , हिमायत फाउंडेशन द्वारा सोशल मीडिया आणि इतर प्लॅटफॉर्म द्वारे पॅलेस्टाईन व गाजि या करता देंनगी देण्याची माहिती प्रसारित केलेली होती संस्थेच्या उद्दिष्टामध्ये नमूद केलेली नाही , पॅलेस्टाईन , गाजला, मदत करण्याचे नावाने जमा केलेला निधी एनजीओच्या अधिकृत बँक खात्यामध्ये न घेता ,बेकायदेशीर रित्या देणगी दारांच्या फसवणूक करून स्वतःच्या पेटीएम बँकेच्या खाता जमा केला जात असल्याची माहिती मिळाली , त्या नुसार दहशतवादी पथका मधील मोसिन यांनी पेटीएम क्युआर कोड वर शंभर रुपये टाकले पण पैसै हिमायत फाउंडेशन नावावर जमा न होता कुरेशी छोटू मिया कुरेशी शाहरुख यांच्या नावावर जमा झाले , विशेष म्हणजे हिमायत फाउंडेशन संस्थेचे एनजीओला बाहेर देशातील उद्देशा करता काम करण्याचे अधिकार नसताना हे काम करत होते , हिमायत फाउंडेशन संस्थेचे सोशल मीडिया द्वारे पॅलेस्टाईन व गाजा मधील मदत कार्यांना पाठिंबा देण्याचा दावा करून लोकांचा विश्वास संपादन करून हिमायत फाउंडेशन च्या नावाने देणगी देण्याचे आव्हान करत असल्याचे दिसले ,त्यानुसार दहशतवाद विरोधी पथक छत्रपती संभाजी नगर यांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१६,३१८, सह कलम ६६ ड नुसार शाहरुख छोटुमिया कुरेशी राहणार मेन रोड राज गल्ली गेवराई तरुणावर गेवराई पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे .प्रकरणाचा पुढिल तपास पोलीस करत आहे

## आरणगावचे सरपंच सचिन शिरसाट समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



केज प्रतिनिधी १मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने सुरेख -सु ंदर सामाजिक संस्थेच्या वतीने आरणगाव चे सरपंच सचिन भैय्या शिरसाठ यांना समाज भूषण पुरस्कार देण्यात आला पुरस्कार देताना ह भ प मुंडे महाराज पुरुषोत्तम आप्पा इथापे वसंत भांगे, अविनाश गाताडे काळेगाव सरपंच बाळासाहेब भांगे अशोक शिरसाट फौजी रतन बापू गायकवाड प्रमोद बोर्डे ओम गायकवाड संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब सु ंदर गायकवाड आदी उपस्थित होते यावेळी शाल फेटा हार सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. उद्योग क्षेत्रामध्ये सचिन सिरसाट यांनी अल्पकालावधीमध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे या निमित्ताने त्यांच्या सामाजिक, उद्योगिक कार्यासाठी सर्व मान्यवरांच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.या पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने आपण समाजातील सर्व घटकांच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी सदैव तत्पर राहू, असे अभिवचन दिले आणि या पुरस्काराबद्दल सुरेख -सुंदर सामाजिक संस्थेचे आभार व्यक्त केले तर या पुढेही आपण समाजातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना प्रोत्साहन देऊन त्यांचा गौरव करू असे संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड यांनी सांगितले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ५ मे २०२५
https://lokaarambh.com


# बिबट्याचं कुटुंब रंगलंय संजय गांधी उद्यानात, नवीन सर्वेक्षणात ५४ बिबटे आढळले

बोरीवलीचे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान म्हणजे एक चमत्कार मानला जातो. जगातल्या कुठल्याच शहरी वस्तीपासून जवळ असलेल्या जंगलात बिबट्यांचा अधिवास नाही. येथे बिबटे आहेत म्हणजे बिबट्यांना शिकार करण्यासाठीची अन्न साखळी असणारे हे समृद्ध जंगल आहे. या संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (SGNP) आणि शेजारच्या तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य (TWLS) परिसरातील बिबट्यांची संख्या मोजण्यात आली. त्यात मुंबईच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि लगतच्या परिसरात 54 बिबट्यांची नोंद करण्यात आली आहे. बोरीवलीचे संजय गांधी उद्यानातील बिबटे आणि या शहरातील माणसे यांच्या अनोख्या सहजीवनाची कहाणी जगावेगळी आहे. या परिसरातील बिबट्यांची संख्या मोजण्यात आली आहे. SGNP, आरे दुग्ध वसाहत परिसर आणि तुंगारेश्वर अभयारण्यामध्ये करण्यात आलेले हे सर्वेक्षण फेब्रुवारी ते जून २०२४ दरम्यान पार पडले आहे. यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरात ५७ ठिकाणी आणि तुंगारेश्वर परिसरात ३३ ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले होते. या संपूर्ण अभ्यासात वन विभागाचे कर्मचारी सक्रियपणे सहभागी झाले आणि बिबट्यांच्या गणतीसाठी विशेष प्रशिक्षण सत्रेही आयोजित करण्यात आली होती.



सर्वेक्षणात 54 बिबट्यांची नोंद झाली आहे. यामध्ये 36 मादी आणि 16 नर होते तसेच 2 बिबट्यांचे लिंग निर्धारण होऊ शकले नाही. याव्यतिरिक्त चार पिल्लांचीही नोंद झाली आहे. तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यात तीन प्रौढ नर बिबट्यांची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे 2015 मध्ये प्रथमच कॅमेरा ट्रॅपमध्ये टिपल्या गेलेल्या तीन मादी 2024 मध्ये पुन्हा एकदा कॅमेरा ट्रॅपमध्ये दिसल्या आहेत.याचाच अर्थ मागील नऊ वर्षांहून अधिक काळापासून त्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात राहत आहेत. कॅमेरा ट्रॅपमध्ये बिबट्यांबरोबरच चितळ, सांबर, रानमांजर, पाम सिव्हेटसारखे सस्तन प्राणी तसेच पिसूरी ( माऊस डीअर ) आणि रस्टी स्पॉटेड कॅटसारख्या दुर्मिळ प्रजातीही आढळल्या आहेत. 9 किमी अंतर पार करून बिबट्या वसई किल्ल्यात या अभ्यासादरम्यान एक विशेष घटना नोंदवली गेली आहे. बिबट्यांना तोंड द्यावे लागत असलेल्या आव्हानांची यातून मुंबईकरांना कल्पना येऊ शकते. प्रथम तुंगारेश्वर अभयारण्य परिसरात आढळलेला एक नर बिबट्या सुमारे 9 किलोमीटर अंतर पार करून घनदाट मानवी वस्त्या, महामार्ग आणि रेल्वे मार्ग ओलांडून वसई किल्ल्यापर्यंत पोहोचल्याचे उघडकीस आले आहे. या घटनेतून या बिबट्यांची परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या क्षमता दिसून येते.

# पुरंदरच्या प्रस्तावित विमानतळावरून शेतकरी आक्रमक, आंदोलकांना बैलगाडा धडकल्याने अनेकजण जखमी

पुरंदरमधील प्रस्तावित विमानतळासाठीच्या भू संपादनाला स्थानिक शेतकऱ्यांकडून जोरदार विरोध केला जात आहे. या स्थानिक शेतकऱ्यांचे आंदोलन काल (३ मे २०२५) अधिक हिंसक झाले. यावेळी आंदोलकांनी दगडफेक केली. या दगडफेकीनंतर शासकीय कामात अडथळा आणल्यामुळे पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला. ज्यामुळे आंदोलक आणि पोलीस यांच्यात मोठी धुमश्चक्री झाली. या घटनेत अनेक पोलीस कर्मचारी आणि आंदोलक जखमी झाले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी आतापर्यंत 300 ते 400 आंदोलकांवर विविध गुन्हे दाखल केले आहेत. तर काही जणांना ताब्यात घेतले आहे. विमानतळ



परिसरात मोर्चा मिळालेल्या माहितीनुसार, काल आंदोलकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत विमानतळ परिसरात मोर्चा काढला होता. एका आंदोलकाने शर्यतीचा बैलगाडा महिला आंदोलकांच्या अंगावरून चालवण्याचा प्रयत्न केला. याचा व्हिडीओ ‘टीव्ही 9 मराठी’ च्या हाती लागला आहे. पोलिसांनी या बैलगाडा चालकाला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आंदोलनादरम्यान शासकीय कामकाजात अडथळा आणणे, पोलिसांना किरकोळ जखमी करणे आणि जीवे मारण्याचा प्रयत्न करणे यांसारख्या आरोपांखाली 300 ते 400 आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती पोलीस उपअधीक्षक यांनी दिली. यापैकी 4 आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून व्हिडीओच्या आधारे इतर आंदोलकांची ओळख पटवून त्यांनाही ताब्यात घेतले जाईल, असे पोलिसांनी सांगितले आहे. या झटापटीत 13 पोलीस अंमलदार आणि 3 अधिकारी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सासवडच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत, असे पोलीस उपअधीक्षक तानाजी बरडे यांनी सांगितले.

चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रतिक्रिया

दरम्यान, राज्याचे भू संपादनमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. “पुरंदर विमानतळासंदर्भात लवकरच मुख्यमंत्र्यांसोबत बैठक आयोजित केली जाईल. भू संपादन मंत्री म्हणून मी स्वतः शेतकऱ्यांशी चर्चा करेन. जमिनीचे कमी दर मिळाले असतील किंवा आंदोलकांच्या मुलांना विमानतळात नोकरी लावण्यासंबंधी काही अडचणी असतील, तर त्या आम्हाला सांगा. मात्र, कोणाचाही जीव धोक्यात येणे आम्हाला मान्य नाही.” असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## गोखले एज्युकेशनच्या बी.एड. मध्ये पदवी समारंभ



परळ येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ाॅफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च मध्ये बी. एड. पदवी प्रदान समारंभाचे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात शै. व. २०२१-२३ व २०२२ -२४ च्या ७२ विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. अश्विनी करवंदे यांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेत रहावे आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे मत डॉ. करवंदे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनोद गावित यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय डॉ. संगीता पाटकर यांनी करून दिला. यानिमित्ताने माजी विद्यार्थींनी महाविद्यालयाच्या आठवणींना उजाळा दिला आणि महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना सामान्य व्यक्तीमधून शिक्षक या असामान्य रूपात परिवर्तन केल्याबद्दल आभार व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. प्रशांत काळे, डॉ. चेतन चव्हाण व डॉ. संदीप बोडके यांनी मार्गदर्शन केले आणि विद्यार्थींनी महाविद्यालयाच्या उन्नती साठी आपले ‘शब्द’ द्यावे अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन परीक्षा विभाग प्रमुख डॉ. संगीता पाटकर आणि माजी विद्यार्थी संघाचे प्रमुख डॉ. विनोद गावित , श्री. चौरे , श्री. हेमंत येळवे यांनी केले व सुत्रसंचलन कु. सिमरन वर्मा यांनी केले

## “माझी सुरक्षा,माझी जबाबदारी”

“ जे चुकला नियमाला, तो चुकला जीवनाला...”

नियम कशासाठी केले जातात?का केले जातात?याचे महत्त्व समजले पाहिजे.पण,समजून घेणे आपल्याला आवडत नाही,म्हणून तर आपल्याला जीवनाला मुकावे लागते. काही गोष्टी आपल्या हातातच असतात,पण त्याकडे आपण जाणूनबुजून दुर्लक्ष करतो,अन् स्वतः च्या पायावर कुऱ्हाड मारून घेतो.

“नियमांची करा अंमलबजावणी आयुष्याला द्या नवी कलाटणी.”

हे जीवन पुन्हा नाही,कारण हे मिळालेले आयुष्य अनमोल देणगी आहे.”अती घाई ,संकटात जाई”... असे त्यामुळेच म्हणतात. आयुष्य हे शांत,विचारपूर्वक चालले,जगले पाहिजे.”माझी सुरक्षा,माझी जबाबदारी”..... हे प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे अन् त्याप्रमाणे जीवन जगले पाहिजे.

सौ.प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण,पुणे ४४

# अवघ्या काही तासांत १२ वीचा निकाल, या सोप्या स्टेप्समध्ये पाहा तुमचा रिझल्ट!


इयत्ता बारावीच्या परीक्षा होऊन बरेच दिवस झाले आहेत. आता सर्वच विद्यार्थ्यांना निकालाची प्रतीक्षा आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकतेच महत्त्वाची माहिती दिली आहे. या माहितीनुसार इयत्ता बारावीचा निकाल 5 मे रोजी जाहीर केला जाणार आहे. 5 मे रोजी निकाल लागणार असल्याचे समजले असले तरी तो कसा पाहावा? निकालाची प्रत कशी डाऊनलोड करावी? हे अनेकांना समजलेले नाही. याच सर्व प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊ या... महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळानुसार इयत्ता बारावीचा फेब्रुवारी-मार्च 2025 चा निकाल 5 मे रोजी लागणार आहे. दुपारी 1 वाजता लागणार आहे. शिक्षण मंडळाने निकाल पाहण्यासाठी काही संकेतस्थळे दिलेली आहेत. शिक्षण मंडळाने नेमके काय सांगितले? (How to download HSC Result) मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च




2025 मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येणार आहे. मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांत ही परीक्षा घेण्यात आली होती. हा निकाल सोमवारी दिनाक 5 मे 2025 रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना कोणत्या संकेतस्थळावर निकाल पाहता येईल? https://www.tv9hindi.com/education/board-exams/maharashtra-board-exams https://results.digilocker.gov.in https://mahahsscboard.in http://hscresult.mkcl.org निकाल कसा पाहावा. (How to check HSC Result) वर नमूद केलेल्या कोणत्याही एक संकेतस्थळावर क्लिक करावे. त्यानंतर View HSC Result या ऑप्शनवर क्लिक करावे. त्यानंतर त्यांनी विचारलेली माहिती टाकून तुमचा निकाल पाहावा. तसेच पुढील शिक्षणाच्या प्रवेशासाठी या निकालाची प्रत डाऊनलोड करून घ्यावी.

# वाऱ्यांची चक्रीय परिस्थिती, पुढील पाच दिवस राज्यात अवकाळी अन गारपीटचे सकट

महाराष्ट्रातील अनेक शहरांचे तापमान 40 अंशाच्या वर पोहचले आहे. त्याचवेळी राज्यात अवकाळी पावसाचे संकट समोर आले आहे. गुजरातच्या समुद्रात वाऱ्यांची चक्रीय परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे पुढील पाच दिवस राज्यात अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रासह राज्यात वादळी वाऱ्यासह गारपीटीचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तसेच प्रादेशिक हवामान विभागाने पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, पुणे, सातारा या भागांत हलक्या आणि मध्यम स्वरुपाचा पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. अरबी समुद्रातून मोठ्या प्रमाणावर बाष्पयुक्त राज्याच्या दिशेने येत आहे. तसेच गुजरातच्या समुद्रात वाऱ्यांची चक्रीय परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे राज्यातील वातावरणात बदल झाला आहे. बुधवार आणि गुरुवारी मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. उष्ण आणि दमट वाऱ्याच्या संगमातून कोकण वगळता संपूर्ण महाराष्ट्रात पुढील पाच दिवस अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. यंदा विदर्भात वारंवार अवकाळी पावसाचे संकट येत आहे. आता पुन्हा नागपूर, अमरावती, वर्धा, यवतमाळ, अकोला, गोंदिया या भागांत वादळी वाऱ्यांसह पाऊस पडणार आहे. विदर्भातील सर्व जिल्ह्यांचे तापमान 40 अंशाच्या वर गेले आहे. परंतु अवकाळीमुळे



तापमानात काही प्रमाणात घसरण होणार आहे. या भागांत कमाल तापमान 38 ते 41 अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील, असा अंदाज आहे. पुणे जिल्ह्याला यलो अलर्ट पुण्यात उद्यापासून काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुणे शहरात पुढील दोन दिवस ढगाळ वातावरण आहे. मंगळवारपासून चार दिवस मेघगर्जना आणि विजेच्या कडकडासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पुणे हवामान विभागाने पुणे जिल्ह्याला यलो अलर्ट दिला आहे. पुण्यातील कमाल तापमानात सरासरी दोन अंश सेल्सिअसने घट झाली आहे. तर किमान तापमानात तीन अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील काही गावांना रविवारी अवकाळी पावसासोबत गारपिटीचा तडाखा बसला. या गारपिटीमुळे पपई, केळी तसेच फळपिकांचे नुकसान झाले आहे. तीळ, उन्हाळी पिके, भाजीपाला पिकांचेही नुकसान झाले आहे. पवनार, सुरगाव, कान्हापूर, रेहकी आदी गावांत गारपीट, अवकाळी पाऊस झाला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com